**<u>ठळक बातम्या</u>**

- रेल्वेची भाडेवाढ मध्यरात्रीपासून लागू होणार, लोकल आणि मासिक पासचे दर जैसे थे

- युट्युब, एक्स, कोरा, इन्स्टाग्रामवर संदेश किंवा प्रतिक्रिया न टाकण्याचे लष्कराचे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना आदेश

- काढे किंवा अर्क आधारित पेयांना चहा म्हणून न विकण्याची FSSAI ची सूचना

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते लखनौमध्ये राष्ट्र प्रेरणा स्थळाचं उद्घाटन

**आणि**

- नाताळनिमित्त सर्वत्र उत्साहाचं वातावरण, पोप लिओ यांच्याकडून रशिया युक्रेन युद्ध तसंच गाझातल्या पॅलेस्टिनी नागरिकांविषयी चिंता व्यक्त

**<><><><><>**

रेल्वेनं प्रवासभाडे आकारणीत बदल केले असून ते मध्यरात्रीपासून लागू होणार आहेत. यापूर्वी तिकीट आरक्षित केलेल्यांना फरकाची कुठलीही रक्कम द्यावी लागणार नाही, असं रेल्वेनं स्पष्ट केलं आहे.

दरवाढीनंतर अनारक्षित किंवा द्वितीय श्रेणीच्या प्रवास भाड्यात पहिल्या २१५ किलोमीटर अंतरापर्यंत काहीही बदल झालेला नाही. द्वितीय श्रेणीतून त्यापुढचा प्रवास करणाऱ्यांना किलोमीटर मागे १ पैसा तर  एक्स्प्रेस गाड्यांमधून प्रवास करणाऱ्यांना प्रति किलोमीटर २ पैसा भाडेवाढ लागू होईल. वातानुकूलित डब्यातून प्रवास करणाऱ्यांनाही प्रति किलोमीटर २ पैसे अतिरिक्त द्यावे लागतील. यामुळे ५०० किलोमीटरचा प्रवास द्वितीय श्रेणीतून करणाऱ्यांचं भाडं १० रुपयांनी वाढणार आहे. तर वातानुकुलित श्रेणीतल्या प्रवासांना २० रुपये अतिरीक्त द्यावे लागतील.

लोकल आणि मासिक पासच्या दरात काहीही बदल केलेला नाही. तसंच आरक्षण शुल्क, सुपरफास्ट शुल्क, जीएसटी आणि इतर शुल्कात काहीही बदल केलेला नसल्याचं रेल्वेनं जाहीर केलं आहे.

<><><><><>

युट्युब, एक्स, कोरा, इन्स्टाग्राम या समाजमाध्यमांवर काहीही संदेश, प्रतिक्रिया टाकू नये असे आदेश भारतीय लष्करानं अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना दिले आहेत. या समाजमाध्यमांवर सुरू असलेल्या गोष्टींची केवळ माहिती घ्यावी असं लष्करानं सर्वांना पाठवलेल्या पत्रात म्हटलं आहे. स्काइप, व्हॉटसअप, टेलिग्राम, सिग्नल या ॲपद्वारे केवळ गुप्त नसलेल्या माहितीची देवाणघेवाण करावी, असंही लष्करानं स्पष्ट केलं आहे. लिंक्डइनवर केवळ स्वतःची व्यावसायिक माहिती नोकरी मिळवण्याच्या उद्देशाने द्यावी, असंही या पत्रात नमूद आहे.

<><><><><>

काढे किंवा अर्क आधारित पेयं टी अर्थात चहा म्हणून विकू नयेत, अशी सूचना FSSAI अर्थात भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणानं केली आहे. रॉयबॉस टी, हर्बल टी, फ्लॉवर टी अशा नावानं अनेक पदार्थ विकले जातात, मात्र प्राधिकरणाच्या नियमांनुसार कॅमेलिया सिनेन्सिस अर्थात चहा या वनस्पतीपासून तयार झालेल्या पेयांनाच चहा म्हणता येतं. यापैकी कोणतीही पेयं चहापासून तयार होत नाहीत, त्यामुळे ते चहा म्हणून विकणं किंवा विक्रीसाठी ठेवणं हे कायद्याने चुकीचं आणि दिशाभूल करणारं असल्याचं प्राधिकरणानं म्हटलं आहे.

<><><><><>

केंद्र सरकारने गेली अकरा वर्षं लोकांच्या कल्याणासाठी काम केलं असून प्रत्येक योजना कुठलाही भेदभाव न करता लोकांपर्यंत पोहोचवली असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. माजी प्रधानमंत्री भारतरत्न अटलबिहारी

वाजपेयी यांच्या १०१व्या जयंतीनिमित्त लखनौ इथं राष्ट्र प्रेरणा स्थळाचं उद्घाटन केल्यानंतर आयोजित जाहीर सभेला ते संबोधित करत होते.

**होल्ड - प्रधानमंत्री बाइट**

समाज, संस्कृती आणि राजकारण यासाठी अटल बिहारी यांचं योगदान मोठं असल्याचं यावेळी संरक्षण मंत्री राजनाथ सिंह म्हणाले. उत्तरप्रदेशाचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ देखील यावेळी उपस्थित होते.

लखनौमधलं राष्ट्रीय प्रेरणा स्थळ ९८ हजार चौरस मीटरवर पसरलं असून कमळाच्या आकाराच्या रचनेचं अत्याधुनिक संग्रहालय इथं बांधण्यात आलं आहे. तसंच भारताच्या जडणघडणीत महत्त्वाचं योगदान देणाऱ्या नेत्यांच्या कारकिर्दीची माहिती देण्यात आली आहे.

**<><><><>**

माजी प्रधानमंत्री दिवंगत अटलबिहारी वाजपेयी यांच्या जयंतीनिमित्त आज देशभरात त्यांना आदरांजली वाहिली जात आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु, उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी नवी दिल्लीतल्या सदैव अटल या समाधीस्थळी जाऊन वाजपेयी यांना आदरांजली वाहिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज मुंबईत अटल बिहारी वाजपेयी यांच्या जयंतीनिमित्त ‘राष्ट्रनायक यांचा जीवन प्रवास’ या चित्रप्रदर्शनाचं उद्घाटन केलं.

**<><><><>**

देशभरातल्या सुमारे ४० लाख शेतकऱ्यांनी आधीच नैसर्गिक शेतीचा अवलंब केला असून त्याद्वारे उत्पादनात वाढ झाल्याचं अनुभवलं आहे, असं केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा म्हणाले. मध्य प्रदेशात रेवा इथं आयोजित नैसर्गिक शेतीवरच्या परिषदेत ते आज बोलत होते. नैसर्गिक शेतीमुळे शेतकऱ्यांचं उत्पन्न वाढतं, पाणी वाचतं आणि रासायनिक खतांमुळे होणारे रोग कमी होतात. त्यामुळे शेतकरी आणि समाज दोघांनाही फायदा होतो, असं शहा म्हणाले.

<><><><><>

ओदिशात कंधमाल जिल्ह्यात आज सुरक्षा दलांबरोबर झालेल्या चकमकीत नक्षलवाद्यांचा नेता गणेश उईके याच्यासह चार नक्षलवादी मारले गेले. चाकपाड पोलीस ठाण्याच्या हद्दीतल्या जंगलात ही चकमक झाली. मारल्या गेलेल्यांमध्ये दोन महिला नक्षलवाद्यांचाही समावेश आहे. गणेश उईके याच्याव्यतिरीक्त इतर तीघांची ओळख अद्याप पटलेली नाही.

गणेश उईके हा बंदी घातलेल्या माओवादी कम्युनिस्ट पक्षाच्या केंद्रीय समितीचा सदस्य, आणि ओदिशातला प्रमुख होता अशी माहिती सुरक्षा दलाच्या अधिकाऱ्यांनी दिली. त्याच्यावर एक कोटी दहा लाख कोटी रुपयांचं बक्षीसही होतं. बेलघर पोलीस ठाण्याच्या हद्दीत गुम्मा इथं झालेल्या दुसऱ्या एका चकमकीत काल रात्री दोन नक्षलवादी मारले गेल्याची माहितीही सुरक्षा दलांनी दिली आहे.

ही कारवाई एक मोठे यश असून ओदिशा आता नक्षलवादापासून पूर्णपणे मुक्त होण्याच्या उंबरठ्यावर उभा आहे असं केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

<><><><><>

नाताळचा सण आज सर्वत्र उत्साहाने साजरा होत आहे. देशभरातल्या चर्चेस आणि प्रार्थनागृहांमधे काल रात्री प्रभू येशू ख्रिस्ताच्या जन्मोत्सवानिमित्त विशेष प्रार्थनांचं आयोजन करण्यात आलं होतं. चर्चेसवर रोषणाई करण्यात आली आहे. नाताळनिमित्त भेटवस्तू घेऊन येणाऱ्या सांताक्लॉजच्या प्रतिकृती लक्ष वेधून घेत आहेत. दुकानं, मॉल्स, उपाहारगृहं आणि पर्यटनस्थळांवर गर्दी झाली आहे. नाताळ निमित्त आज मुंबईतले शेअर, वस्तू, आणि वायदे बाजार बंद आहेत. नाताळनिमित्त राज्यात विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले असून चर्चमध्ये येशू जन्माचे देखावे साकारण्यात आले तसंच कॅरोल गायनासह विविध कार्यक्रम झाले.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन यांनी देशवासियांना नाताळनिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. या सणातून शांती, सलोखा, समता आणि सेवेचा संदेश समाजाला मिळतो असं राष्ट्रपतींनी शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे. येशू ख्रिस्तांची शिकवण सामाजिक नात्यांचे बंध दृढ करते आणि शांततेचा पुरस्कार करते अशा शब्दात उपराष्ट्रपतींनी शुभेच्छा दिल्या आहेत.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज दिल्लीतल्या कॅथेड्रल चर्च ऑफ द रिडेम्पशनमधे जाऊन सामूहिक प्रार्थनेत भाग घेतला. नाताळचा सण समाजात सद्भावना आणि सलोखा निर्माण करतो असं त्यांनी शुभसंदेशात म्हटलं आहे.

**<><><><><>**

ख्रिस्ती धर्मप्रमुख पोप लिओ यांनी नाताळ निमित्त पहिलं प्रवचन दिलं. रशिया-युक्रेन युद्ध थांबवण्यासाठी दोन्ही बाजूंनी थेट चर्चा करावी असं मत त्यांनी मांडलं. गाझामधल्या पॅलेस्टिनींच्या हालअपेष्टांना सुद्धा त्यांनी वाचा फोडली. गाझातल्या दुर्बल विस्थापितांचा विचार आपण केला पाहिजे असं ते म्हणाले.

**<><><><><>**

केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेसंदर्भात दिशाभूल करणारी जाहिरात केल्याबद्दल व्हिजन आयएएस या प्रशिक्षण संस्थेला ११ लाख रुपये दंड ठोठावण्यात आला आहे. २०२२ आणि २०२३ मधे झालेल्या नागरी सेवा परीक्षांमधले ११९ यशस्वी उमेदवार आपल्या संस्थेचे असल्याचं दाखवून त्यांच्या यशाचं श्रेय या संस्थेनं आपल्या जाहिरातीत घेतलं होतं. प्रत्यक्षात त्यातले फक्त ३ उमेदवार या संस्थेचे प्रशिक्षणार्थी होते. याविरुद्ध दाखल तक्रारीवर केंद्रीय ग्राहक संरक्षण प्राधिकरणाने हा दंड ठोठावला. अशा प्रकारच्या २८ प्रशिक्षण संस्थांना मिळून आतापर्यंत एक कोटीपेक्षा जास्त दंड झाला आहे.

**<><><><><>**

देशभरात विविध ठिकाणी झालेल्या खासदार क्रीडामहोत्सवांचा समारोप आज झाला. संसद खेल महोत्सवामुळे देशाला हजारो खेळाडू मिळाले असून या महोत्सवाची व्याप्ती आणि प्रभाव मोठ्या प्रमाणात वाढला आहे, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी म्हणाले. सर्व पालकांनी आपल्या पाल्यांना खेळण्यासाठी प्रोत्साहन द्यावं असं आवाहनही त्यांनी केलं.

**//<><><><><>//**